**जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा**
**सिव्हिल लाईन,वर्धा**

फोन नं. ०७१५२-२४३४४६/२४०८७२. वेब साईड – WWW.Wardha.nic.in
फॅक्स नं.- ०७१५२-२४०५३३. ई-मेल – Wardhardc@gmail.com.

जिआव्यअ/प्रशिक्षण/कावि - 241/2017. दिनांक - 30 मे,2017.

# जाहिरात

महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन (MDRM) कार्यक्रमांतर्गत, वर्धा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण मार्फत जिल्हा व तालुका स्तरावरील आपत्ती व्यवस्थापन विषयावर स्वयंसेवकांचे (कार्यशाळा) प्रशिक्षण, बोट चालक प्रशिक्षण, शोध व बचाव प्रशिक्षण, प्रथमोपचार प्रशिक्षण, आग व्यवस्थापन प्रशिक्षण इ. विविध विषयांचे, विविध गटांना **जिल्हयातील धरण परिसरात निवासी (कार्यशाळा) प्रशिक्षण** देण्याकरीता मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

निविदा अटी व शर्ती www.wardha.inc.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

**कामाचे नाव - आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण (कार्यशाळा) निविदा जाहिरात.**

| | |
|---|---|
| कोरा निविदा फॉर्म | रु. 500/- |
| इसारा रक्कम 1% | रु. 2,000/- |
| सुरक्षा अनामत रक्कम 3% | रु. 20,000/- |
| निविदा प्रसिध्द करणे | दिनांक - 01 जून, 2017. सकाळी - 11.00 वा. |
| निविदा अर्ज उपलब्ध कालावधी | दि. - 01 जून, 2017 रोजी सकाळी 11.00 वाजेपासुन ते दि. - 07 जून, 2017 दुपारी 02.00 वाजेपर्यंत (सुटीचे दिवस वगळता) |
| निविदा पुर्व बैठक | दिनांक - 02 जून, 2017 ला दुपारी 1.00 वा. (निवासी उप-जिल्हाधिकारी वर्धा, यांचे दालनात) |
| संपर्क अधिकारी | निवासी उप-जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा आपत्ती व्य. प्राधिकरण समिती, वर्धा. दुरधवनी क्र. 07152-240872 |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दि. | दिनांक - 07 जून, 2017 ला दुपारी 02.00 वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक/वेळ | दिनांक - 09 जून, 2017 ला दुपारी 03.00 वाजता. |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | निवासी उप-जिल्हाधिकारी, वर्धा यांचे दालन. |

**निवासी उप-जिल्हाधिकारी**
**तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,वर्धा.**

**प्रतिलीपी -**

१) जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा यांनी सदर निविदा जाहिरात वृत्तपत्रांमध्ये वेळेत प्रकाशित करुन प्रकाशित निविदा जाहिरात चे कात्रण या कार्यालयास सादर करावे.

२) जिल्हा नाझर,वर्धा यांनी सदर निविदा जाहिरात प्रसिध्दिकरीता कार्यालयीन नोटीस बोर्ड वर लावण्यात यावी.

३) जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी (NIC) वर्धा यांनी सदर निविदा जाहिरात वर्धा जिल्हा वेबसाईड वर अपलोड करुन प्रसिध्द करावी.

## अटी व शर्ती -

१) सर्व प्रशिक्षण (कार्यशाळा) प्रात्याक्षिकासह घेणे आवश्यक राहिल.
२) प्रशिक्षण निवासी राहिल. प्रशिक्षणा दरम्यान निवास, भोजन, चहा, नास्ता इ. ची उत्तम प्रतिची व्यवस्था करण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहिल.
३) प्रशिक्षणा दरम्यान आपत्ती व्यवस्थापन बाबत प्राथमिक माहिती, कार्यालयीन फायर सेफ्टी ऑडिट, पुर व आग व्यवस्थापन, बोटींग, स्ट्रेचर व लिफ्ट मेकिंग डेमो, योगा, वाटर राप्ट मेकिंग, शोध व बचाव प्रात्याक्षिक, गट चर्चा, रस्ते अपघात, बोट चालक प्रशिक्षण इ. विविध विषयांचा अंतर्भाव करावा लागेल.
४) प्रशिक्षणा दरम्यान प्रात्याक्षिका करीता प्रात्याक्षिक साहित्य, प्रशिक्षक व इतर सर्व आवश्यक साहित्य इ. ची व्यवस्था निविदा धारकास स्वतः करावी लागेल त्या करिता जिल्हा प्रशासनाचे कोणत्याहि प्रकारचे सहकार्य मिळणार नाहि अथवा अन्य भत्ते देय राहणार नाही.
५) संस्था नोंदणीकृत असल्याबाबतचे कागदपत्रे जोडावी.
६) आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण (प्रात्याक्षिकासह) देण्याबाबतचा अनुभव असणे आवश्यक. तसेच त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडावे.
७) सन २०१६-१७ चे संस्थेचे आर्थिक विवरणपत्र (ताळेबंदपत्रक ३१/०३/२०१७) जोडावे. तसेच, अद्यावत लेखापरिक्षण अहवाल प्रत जोडणे आवश्यक आहे.
८) संचालक मंडळ यादी (संपूर्ण नाव, पत्ता, संपर्क क्रमांक सह) जोडणे आवश्यक.
९) निविदे सोबत राष्ट्रीयकृत बँकेचा रु. २०००/- (रु. दोन हजार फक्त) धनाकर्ष (DD) जिल्हाधिकारी, वर्धा यांचे नावे जोडणे आवश्यक राहिल.
१०) संस्थाविरुध्द कोणत्याही प्रकारचे फौजदारी, न्यायालयीन, ब्लॅक लिस्ट इत्यादी बाबत कार्यवाही नसल्यबाबत संस्था अध्यक्षांचे हमी पत्र जोडावे.
११) तांत्रिक बाबी पुर्ण केल्यानंतर निविदाधारकांना पावर पाईंड प्रेझेंटेशन करुन दाखविणे बंधनकारक असून त्यात पात्र निविदाधारकांचेच दर पत्रक उधडण्यात येईल.
१२) वरिल सर्व बाबींची पुर्तता करणे बंधनकारक राहिल अन्यथा निविदा विचारात घेतली जाणार नाहि.
१३) प्रशिक्षण कालावधीमध्ये नैसर्गिक, मानवनिर्मीत आपत्ती मुळे जसे अपघात, आग व इतर कारणास्तव कोणत्याहि प्रकारचे नुकसान झाल्यास सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहिल.

१४) सर्व प्रशिक्षणाचा अहवाल हार्ड व स्वॉफ्ट कॉपी मध्ये ( जसे व्हिडीओ शुटींग, फोटो व उपस्थितांच्या पुराव्यासह) प्रशिक्षण झाल्यानंतर दोन दिवसांचे आत सादर करणे बंधनकारक राहिल.

१५) आदेश दिल्यानंतर कार्याची अंमलबजावणी न केल्यास जिल्हाधिकारी निश्चित करेल त्या दराने दंडाची आकारणी करण्यात येईल.

१६) प्रशिक्षणादरम्यान सर्व उपस्थित प्रशिक्षणार्थी यांना दोन वेळा जेवण/ चहा, एक वेळ नास्ता तथा बैठक, निवास, ध्वनी प्रक्षेपण, पावर पाईंड प्रेझंनटेशन इ. ची व्यवस्था व तत्संबंधी सर्व बाबींची व्यवस्था निविदाधारक यांनी करणे बंधनकारक राहिल.

१७) प्रशिक्षणा दरम्यान होणा-या सर्व बाबीं वरील खर्चाची देयके सर्व प्रशिक्षण कार्यक्रम झाल्यानंतर एकत्रित या कार्यालयास सादर करावी. सदर देयकाचे भुगतान जिल्हाधिकारी यांचे मंजुरीनंतर धनादेशाव्दारे करण्यात येईल.

१८) प्राप्त निविदां पैकी कोणतीही निविदा स्विकृत करण्याचा अथवा कोणतीही निविदा कारण न देता निविदा रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

१९) प्रशिक्षणात आवश्यक वाचन साहित्य स्वतः उपलब्ध करुन द्यावे.

२०) प्रशिक्षण या कार्यालयाच्या नियोजनाप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२१) सदर काम दुस-या व्यक्तीस/ संस्थेस देता येणार नाहि. किंवा एजेंट नेमता येणार नाही.

२२) निविदा धारकास अदा करण्यात येणा-या रक्कमेवरिल नियमानुसार आयकर/ टिडीएस कपात करण्यात येईल.

२३) निविदेमध्ये प्रती प्रशिक्षणार्थी खर्च (दोन दिवस निवास, भोजन, चहा, नास्ता व इतर प्रशिक्षण आणि प्रात्याक्षिक खर्चासह नमुद करावे.)

२४) निविदा तांत्रिक लिफापा (परिशिष्ट “अ”) व दर पत्रक (परिशिष्ट “ब”) असे दोन स्वतंत्र मोहरबंद लिफापे तयार करुन एका मोहरबंद लिफाप्यामध्ये सादर करावी.

**२५) सदर निविदा (किंमत रुपये ५००/-) पाचशे रुपये फक्त जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नाझर यांचेकडे उपलब्ध राहील.**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,वर्धा.**

## परिशिष्ट “अ”
## तांत्रिक लिफाप्यासोबत जोडावयाचे

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण समिती,
वर्धा.

विषय - आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण (कार्यशाळा) निविदा जाहिरात.
संदर्भ - आपले कार्यालयाने प्रसिध्द केलेली जाहिरात दिनांक ०१ जून, २०१७.

वरील विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, प्रसिध्द जाहिर निविदेमधील सुचनेच्या अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक लिफाप्यामध्ये संस्थेबध्दल द्यावयाची माहिती पुढीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **शेरा** |
|---|---|---|
| 1. | संस्थेचे पुर्ण नांव | |
| 2. | संस्थेचा पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता(ई-मेल व संपर्क क्रमांकासह) | |
| 3. | संस्था नोंदणी क्रमांक तथा यापुर्वीचा काही अनुभव असल्यास त्यानुसार, प्रशिक्षण साहित्य/बुकलेट उपलब्ध असल्यास सादर करावे. | |
| 4. | जिल्ह्यातील धरण परीसरात कार्यशाळा आयोजनाबाबतचे नियोजन व उपलब्ध साहित्य सेट-अप बाबत माहिती. | |
| 5. | डी.डी.क्रमांक व दिनांक बँकेचे नावासह. | |
| 6. | अटी व शर्ती मध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व बाबींची पुर्तता तांत्रिक लिफाप्यात असणे आवश्यक आहे. | |

वर दर्शविलेली माहिती ही पुर्णपणे खरी आहे तथा मला निविदेमधील सर्व अटी व शर्ती पुर्ण पणे मान्य आहे.

दिनांकः-
ठिकणः-

स्वक्षरी /-
अध्यक्ष / सचिव
संपुर्ण नांव व पत्ता
(संपर्क क्रमांकासह)

**परिशिष्ट “ब”**

**दर पत्रक**

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण (कार्यशाळा) निविदा जीहिरात.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **दर (प्रती व्यक्ती दोन दिवसीय)** |
|---|---|---|
| 1. | प्रशिक्षण प्रात्याक्षिक खर्च व निवास, भोजन, चहा, नास्ता व इतर व्यवस्था.<br>(प्रती प्रशिक्षणार्थी दोन दिवसीय खर्च - प्रशिक्षण, हॉल, ध्वनीक्षेपक, प्रोजेक्टर, खुर्ची, फोटो, शुटींग, प्रात्याक्षिक, बोट चालक प्रशिक्षण व इतर सर्व आवश्यक खर्च, वाचन साहित्यासह.) | |
| 2. | **एकूण** | |

दिनांकः-

ठिकणः-

स्वक्षरी /-

अध्यक्ष / सचिव

संपुर्ण नांव व पत्ता

(संपर्क क्रमांकासह)